लोकशाही
संपादकीय

## महापालिका आयुक्तांना घेराव घालताच रस्त्याचे काम सुरू !



गेल्या तीस वर्षापासून जळगाव महानगरपालिका आमच्याकडून कर वसुलीत आहे. नागरी सुविधा मात्र काहीच देत नाही. म्हणून शहरातील आशा बाबा नगर, माऊली नगर, अथर्व कॉलनी, आरएस कॉलनी आणि गणेश पार्क परिसरात नागरिकांनी गुरुवार दिनांक २० मार्च रोजी सकाळी ११ वाजता महापालिका कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन सुरू केले. महापालिका आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे हे काही कामानिमित्त महापालिकेतून बाहेर यायला निघाले, तेव्हा त्यांच्या गाडीसमोर ठिय्या घालून नागरिकांनी घेराव घातला. संतापाच्या भरात नागरिकांनी "३० वर्षे झाली कर घेताना लाज नाही वाटत आणि सुविधा देताना मात्र लाज वाटते..", "आमच्या हक्काचा आम्ही घेणारच..", "कोण म्हणतं देणार नाही, घेतल्याशिवाय राहणार नाही.." अशा प्रकारच्या घोषणा देत परिसर दणाणून टाकला. घोषणाबाजी करत नागरिकांनी आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांच्या गाडीला घेराव घातला होता. 'रस्त्याची कामे सुरू होतील' असे आश्वासन दिल्यानंतरच आयुक्तांना घातलेला घेराव मागे घेण्यात आला. आणि आश्चर्य म्हणजे दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास स्वतः आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, शहर अभियंता मनीष अमृतकर आणि शहर रचनाकार समीर बोरवले यांनी मिळून प्रत्यक्ष रस्त्याची स्पॉट पाहणी करून रस्त्याची कामे सुरू करण्याचे आदेश दिले. 'नाक दाबले की तोंड उघडते' म्हणतात.. तशातला हा प्रकार म्हणता येईल. गेल्या पाच वर्षापासून या भागातील रस्त्यांच्या कामांना मंजुरी मिळाली असताना या रस्त्याचे काम का होत नाही? असा सवाल संतप्त नागरिकांनी केला. तेव्हा शहर अभियंता मनीष अमृतकर यांनी वर्क ऑर्डरच्या फायली दडपून ठेवल्या असल्याचा आरोप नागरिक आणि ठेकेदार यांनी केला. ही कामे सुरू करण्यासाठी मनीष अमृतकर ५० लाख रुपयांची मागणी करीत असल्याचा आरोपही आयुक्तांसमोर ठेकेदारांनी केला. अर्थात या आरोपाचे मनीष अमृतसर यांनी खंडन केले असले, तरी पाणी कुठेतरी मूर्ती आहे, असेच म्हणावे लागेल. सर्वसामान्य नागरिकांच्या भेटीची दखल न घेणे, हाच प्रमुख धंदा महापालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांना आहे. आमचे कोणी काहीही वाकडे करू शकत नाही, अश्या अविर्भावात ते अधिकारी वावरतात. जणू काय स्वतःच्या पैशातून नागरी सुविधा आणि रस्त्यांची कामे करत आहेत, असे त्यांना वाटते. शहर अभियंता म्हणून पद भूषवणारे मनीष अमृतकर हे शहर अभियंता पदाचा पदभार घेतला असले तरी ते बिल्डिंग इन्स्पेक्टर या पदावर असल्याने शहर अभियंतापद हे रिकामेच आहे. त्याचा पदभार अमृतकर यांच्याकडे आहे. त्यामुळे अभियंतापदाचे कोलीत त्यांचे हवाले दिले असले तरी त्याबाबतची पर्यायी व्यवस्था महापालिकेने तातडीने करावी, ही अपेक्षा. पण ते हे काम का करत नाही? यामागचे कोडे मात्र कळत नाही. परंतु अशा बाबा नगर आदी भागातील नागरिकांनी जो रुद्रावतार धारण केला तसाच रुद्रावतार शहरातील इतर भागातील नागरिकांनी करावा, ही महापालिका प्रशासनाची इच्छा आहे का?

जळगाव शहरातील रस्त्यांचा प्रश्न गेल्या एक तपापासून रेंगाळला आहे. अमृत पाणीपुरवठा योजना आणि मलनित्सारण योजनेसाठी रस्ते खोदले गेल्याने रस्त्यांची कामे रेंगाळली, हे आम्ही समजू शकतो. निधीची अपूर्णता होती हेही समजू शकतो. आता निधी उपलब्ध असताना कामे का होत नाहीत? हा खरा प्रश्न आहे. मध्यंतरी ठेकेदारांना पैसे मिळाले नाहीत म्हणून त्यांची संप पुकारला होता. आता निधी उपलब्ध झाल्यानंतर रस्त्याची कामे का पेंडिंग आहेत? ते मात्र कळत नाही. नेरी नाका ते चित्रा चौक रस्ता बेंडाळे चौकापर्यंत पेंडिंग असल्याने तेथून जाणाऱ्या येणाऱ्या वाहनधारकांचे हाल बघवत नाहीत. तसेच शाहू नगर ते पिंपराळा रेल्वे गेट हा १०० सव्वाशे मीटरचा रस्ता देखील अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. रस्त्यावरील टोकदार खडे अक्षरशः वर आले आहेत. वाहनधारकांना मोठ्या प्रमाणावर कसरत करून वाहन चालवावी लागतात. वाढती वर्दळ असलेल्या रस्त्यांची कामे युद्ध पातळीवरून करून घेणे ही महापालिकेची जबाबदारी असताना वाहनांच्या होणाऱ्या कोंडीमुळे वेळेचा अपव्य होतो. तरी महापालिका प्रशासन गप्प का? जळगाव वासियांचा कोणी वाली आहे की नाही? असा प्रश्न सतत भेडसावत असतो. शहराचे आमदार शहरवासीयांच्या तोंडाला पाने पुसतात. महापालिका प्रशासन त्याची नित्य कामे सुद्धा नीटनेटकेपणे करत नाही. महिनाभरापूर्वी काढलेली अतिक्रमणे पुन्हा जैसे थे झाली आहेत. त्याचे कारण काय? कालिंका माता चौकात डंपरने बालकांना चिरडले. संतप्त नागरिकाकडून डंपर जाळण्यात आला. रास्ता रोको झाला. तेवढ्यापुरते काही दिवस तेथील अतिक्रमणे हटवले. आता पुन्हा तेथे जैसे थे परिस्थिती झाली आहे. तिथे पुन्हा अतिक्रमणे वाढले आहे. अतिक्रमण धारकांकडून हप्ते घेतले जातात, असा सरळ आरोप नागरिक करतात. महापालिकेच्या सर्व विभागांकडून कामे गतिमान पद्धतीने नियमित करून घेण्याची जबाबदारी महापालिका आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांची असताना ते दुर्लक्ष करण्याचे कारण काय? 'अधिकारी त्यांचे ऐकत नाहीत' असे म्हणावे काय? महापालिकेच्या ढिसाळ प्रशासनामुळे जळगाव शहराची बदनामी होते आहे. "जळगाव महापालिका भाडेतत्त्वावर देणे आहे..!" असे नागरिक बोलतात. तेव्हा अशा स्थितीत महापालिका प्रशासनाचे लाड का केले जातात हेच मात्र कळत नाही..!

# संस्कृतीमध्ये विकृती आणणे भविष्यासाठी घातक

**'होळीचे प्राकृतिक रंग, सनातन हिंदू संस्कृती संग' महोत्सवात श्याम चैतन्यजी महाराज यांचे सूचक आवाहन**

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जामनेर** प्रतिनिधी

सनातन हिंदू संस्कृती जपून ठेवणे काळाची गरज असून आज हिंदूवर होणारे अन्याय, आक्रमणाला सामोरे जावून हिंदू संस्कृती टिकवण्यासाठी सर्वांनी एकत्रित येऊन संघटित होणे गरजेचे असल्याचे गुरुदेव सेवाश्रम ट्रस्टचे श्री श्याम चैतन्य जी महाराज यांनी सांगितले.

होळी निमित्त होळीचे प्राकृतिक रंग, सनातन हिंदू संस्कृती संग भव्य सांस्कृतिक होली महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन जामनेर येथील चैतन्यधाम, श्री गुरुदेव सेवाश्रम ट्रस्ट येथे दि. १९ मार्च रोजी सायंकाळी ६-०० ते रात्री ११-०० दरम्यान साजरा करण्यात आला.

ते बोलताना पुढे म्हणाले की, युवा पिढीला व्यसन रुपी लागलेली कीड मोडून काढून आपल्या मनातील कचरा जाळून टाकणे हाच खरं होळी सण साजरा करण्याचा उद्देश आहे. आपल्या जीवनात उत्सव आवश्यक आहे पण ते साजरे करताना सात्विकता आवश्यकता असून पूर्वापार चालत आलेली



संस्कृतीत विकृती आणणे भविष्यासाठी घातक ठरेल असे न वागता प्राकृतिक नैसर्गिक पारंपरिक उत्सव साजरी करणे ही आज काळाची गरज आहे, असे प्रतिपादन केले. या भव्य सांस्कृतिक होळी महोत्सवात स्पर्धा घेऊन आदिवासी बांधवांनी पारंपारिक ड्रेस, वेशभूषा, केशभूषा असे शृंगार करून आपल्या संस्कृतीने जतन केलेले वेगवेगळे पारंपारिक नृत्य सादर केले.

या नृत्य प्रकारात जळगाव जिल्ह्यासह महाराष्ट्रातून अनेक आदिवासी बांधव श्री गुरुदेव सेवाश्रम येथे उपस्थित होते. लेंगी नृत्य प्रकारात प्रथम येणाऱ्याला ५१०० द्वितीय येणाऱ्याला ३१०० व तृतीय येणाऱ्याला २१०० असे बक्षीस ठेवण्यात आले होते. व श्री राधा कृष्णा सोबत फुलांची होळी उधळण करून होली साजरी केली.

या कार्यक्रमाला या मान्यवरांची होती उपस्थिती गोकुळ चव्हाण, लख्खू सिंग राठोड, बाबूराव चव्हाण, रंगलाल चव्हाण, मोतीलाल घ्यार, अर्जुन जाधव, कांतीलाल जाधव, बी बी धाडी, पुखराज पवार, डॉ सुभाष पवार, डॉ आशिष वाघ, डॉ विश्वजित सिसोदे, विठ्ठल जाधव, जामनेर तालुका, सोयगाव तालुका, पारोळा तालुका, व बुलढाण जिल्ह्यातून हजारो भाविक भक्त होळी च्या सांस्कृतिक सहभाग नोंदविला. . तर प्रोग्राम यशस्वीतेसाठी नटवर चव्हाण, नीलेश चव्हाण, सुधाकर पवार, दिलीप चव्हाण, शत्रुघन चव्हाण, उदय नाईक, रोहिदास पवार, कैलास पवार, आदींनी परिश्रम घेतले व आभार किशोर यांनी मानले.



## धानोरा विद्यालयात स्वच्छता, आरोग्यविषयी मार्गदर्शन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**धानोरा ता. चोपडा** प्रतिनिधी

येथील झि. तो. महाजन माध्यमिक व ना. भा. पाटील ज्युनिअर कॉलेजात गांधी तीर्थ स्वच्छता अभियान अंतर्गत आरोग्य दिनानिमित्त धानोरा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रियंका बेहडे यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य व स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. त्याचबरोबर स्वच्छ शरीर तर स्वस्थ शरीर याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. याप्रसंगी आरोग्य सेविका रचना खोब्रागडे, सना शेख, प्रभारी पर्यवेक्षक एल. डी. पाटील, शालेय स्वच्छता समितीचे अध्यक्ष वासुदेव महाजन, उपाध्यक्ष प्रा. मिलिंद बडगुजर, व्ही. डी. कोष्टी, प्रा. रेखा महाजन, पुनम पाटील, सी. आर. चौधरी, एस. डी. सोनवणे, प्रा. एस. सी. पाटील, दीपक पाटील, कल्याणी महाजन, सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## मुलांच्या हायस्कुलमध्ये वार्षिक गुणगौरव समारंभ

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चाळीसगाव** प्रतिनिधी

चाळीसगाव एज्युकेशन सोसायटीचे आ. बं. मुलांचे हायस्कुलमध्ये गुणगौरव समारंभ उत्साहात साजरा झाला, कार्यक्रमाचे प्रमुख उद्योजक सुशील अग्रवाल तर प्रमुख पाहुणे महावितरणचे अभियंता नितीन घुमरे साहेब होते. यावेळी व्यासपीठावर आ, बं, मुलांचे विद्यालयाचे चेअरमन योगेश अग्रवाल, जेष्ठ संचालक आबासाहेब मु, रा, अमृतकार, अध्यक्ष आर, सी, पाटील, उपाध्यक्ष मिलिंद देशमुख, संचालक रवींद्र राजपूत, संचालक योगेश करंकाळ,



विद्यालयाचे मुख्याध्यापक बाबा सोनवणे, उपमुख्याध्यापिका सुनीता पाटील, पर्यवेक्षक शरद जाधव, पर्यवेक्षक महेंद्र कुमावत, शिक्षक प्रतिनिधी मनोहर सूर्यवंशी एच, एच, पटेल विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील पाटील आदी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचा परिचय कलाशिक्षक चेतन कुऱ्हाडे यांनी करून दिला. विद्यालयाचे चेअरमन योगेश अग्रवाल यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तसेच शाळेचे मा विद्यार्थी घुमरे, शालेय जीवनातील वनात अनुभव सांगितले. यावेळी राज्यस्तरावर यशस्वी झालेल्या विविध विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी गुणवंत शिक्षकांना देखील व्यासपीठावर सन्मानित करण्यात आले. अध्यक्षीय भाषण सुशील अग्रवाल यांनी केले. कार्यक्रम प्रास्ताविक मुख्याध्यापक बाबा सोनवणे यांनी सादर केले. सूत्रसंचालन श्वेता सोमाणी व वंदना मोराणकर यांनी केले. जयदीप गांगुर्डे सचिन नागमोती प्रदीप ठाकूर दीपक राखुंडे यांनी बक्षीस वितरणाचे काम पाहिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विविध समित्यातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी यांनी मेहनत घेतली. आभार पर्यवेक्षक महेंद्र कुमावत यांनी मानले.

## ओबीसी महाएल्गार सभेला उपस्थित रहा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाळधी** प्रतिनिधी

जळगाव येथे आयोजित २२ मार्च रोजी ओबीसी भटके विमुक्त बारा बलुतेदार समाजाचा महाएल्गार मेळावा आयोजित करण्यात आला असून या अनुषंगाने पाळधी येथे समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष बाळासाहेब कर्डक यांचा अध्यक्षतेखाली आडवा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. महाएल्गार मेळाव्याला प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्याचे माजी उपमुख्यमंत्री ओबीसी नेते छगनरावजी भुजबळ साहेब



उपस्थित राहणार आहेत. बैठकी प्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांनी ओबीसी समाज बांधवांना हजारोच्या संख्येने सभास्थळी येण्याचे आवाहन केले. तसेच पाळधी येथून बाईक रॅलीचे देखील करण्यात येणार असून त्याची देखील माहिती बैठकीत देण्यात आली. प्रसंगी उद्योगपती दिलीप बापू पाटील अनिल नळे, माजी सरपंच हेमंत पाटील, चंदू माळी, समता परिषद युवक जिल्हाध्यक्ष भूषण महाजन, रवींद्र माळी, दिलीप माळी, भिकन माळी, कृष्णा माळी, वसंत पाटील, सुभाष कापुर, हेमंत कुंभार, यासह अन्य ओबीसी समाज बांधव उपस्थित होते.

## पाचोऱ्यात आज राष्ट्रीय लोकन्यायालय

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाचोरा** प्रतिनिधी

महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण मुंबई तथा उच्च न्यायालय मुंबई तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जळगाव यांचे आदेशावर पाचोरा येथे तालुका विधी सेवा समिती पाचोरा मार्फत राष्ट्रीय लोकन्यायालय २२ मार्च २०२५ रोजी पाचोरा न्यायालयात आयोजन करण्यात आलेले आहे. यावेळी घेण्यात आलेल्या सभेमध्ये तालुका विधी सेवा समिती पाचोराचे अध्यक्ष तथा न्यायीक अधिकारी दिवाणी न्यायाधीश जी. बी. औंधकर, सह दिवाणी न्यायाधीश एस. व्ही. निमसे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश जी एस बोरा मॅडम व ज्येष्ठ वकील मंडळी उपस्थित होते. या लोक न्यायालयामध्ये नियमित दिवाणी दावे, नियमित दरखास्त, संक्षिप्त फौजदारी खटले, धनादेश अनादर, वैवाहिक प्रकरणे, न्यायालयातील प्रलंबित इतर खटले व ज्या खटल्यांमध्ये कायद्याने तडजोड करता येणे शक्य आहे असे दिवाणी व फौजदारी खटले तडजोडीने निकाली काढण्यासाठी ठेवता येतील. याशिवाय राष्ट्रीयकृत बँका, मोबाइल कंपनी, दूरध्वनी व वीज कार्यालय, ग्रामपंचायत घरपट्टी पाणीपट्टी बाबतची वादपूर्व प्रकरणे, थकीत रकमेमध्ये सूट देणे बाबत प्रस्तावित केलेले आहे याप्रसंगी उपस्थितितांनी पाचोरा तालुका परिसरातील नागरिकांना आवाहन केले आहे की, २२ मार्च २०२५ रोजी होणाऱ्या लोकन्यायालयात प्रलंबित वादातीत व वादपूर्व प्रकरणे तडजोडीने सोडविणे करता जास्तीत जास्त प्रकरणे ठेवून सहभाग नोंदवावा व लोकन्यायालय या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## शेतकी संघाच्या चेअरमनपदी गजानन पाटील बिनविरोध

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाळधी** प्रतिनिधी

एरंडोल धरणगाव तालुका शेतकी संघाची चेअरमन व्हाईस चेअरमन पदाची निवडणूक १८ मार्च मंगळवार रोजी पार पडली त्यामध्ये शिवसेनेचे गजानन धनसिंग पाटील राहणार सातखेडा तालुका धरणगाव तसेच व्हॉइस चेअरमन पदी भाजपाचे संजय माणिक जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सदर निवडणुकीमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपनिबंधक देशमुख यांनी काम पाहिले, तर सचिव अरुण पाटील यांनी त्यांना सहकार्य केले. सकाळी ११ वाजता अर्ज दाखल करण्यात आले. दुपारी एक वाजेपर्यंत चेअरमन पदासाठी गजानन पाटील व्हाईस चेअरमन पदासाठी संजय जाधव या दोघांचे अर्ज आल्याने त्यांना दुपारी बिनविरोध चेअरमन चेअरमन म्हणून घोषित करण्यात आले. गजानन पाटील हे पाणीपुरवठा



व स्वच्छता मंत्री पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे खंदे समर्थक आहेत. गेले ४० वर्षापासून शिवसेनेमध्ये ते कार्यरत आहेत. निवडणूकीत शेतकी संघाचे संचालक ज्ञानेश्वर महाजन संभाजी चव्हाण शरद पाटील प्रकाश महाजन धनराज महाजन पवन सोनवणे सुमनबाई पाटील रवींद्र चव्हाण सोनल पवार विनोद पाटील कल्पना अहिरे रवींद्र जाधव प्रतिभा पाटील रवींद्र चौधरी संजय माडी गोपाल पाटील हे संचालक मंडळ निवडणुकीच्या वेळेस शेती संघात उपस्थित होते. सदर निवडीबद्दल शिवसेना नेते पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी गजानन पाटील संजय जाधव यांचे अभिनंदन केले आहे.

## नव्या नंबरप्लेटसाठी मुदतवाढ

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट अर्थात एचएसआरपी नंबर प्लेट सर्व प्रकारच्या वाहनांना बसवणं आता शासनानं बंधनकारक केलं आहे. त्यानुसार २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना ही नंबर प्लेट बसवण्यासाठी सध्या राज्यात मोहिम सुरु आहे. यासाठी ३० मार्च २०२५ ही डेडलाईन देण्यात आली होती. पण ही डेडलाईन संपायला केवळ दहाच दिवस शिल्लक असताना आता याला मुदतवाढ देण्यात आली आहे. जुन्या वाहनांना ही एचएसआरपी नंबर प्लेट बसवण्यासाठी आता ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. या मुदतवाढीच्या अनुषंगानं सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रात याबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती करावी. तसंच स्थानिक वाहन वितरक, ऑटोरिक्षा, टॅक्सी, बस, ट्रक संघटनांची बैठक घेऊन याबाबत सर्वांना अवगत करावं, असं निर्देश या परिपत्रकातून देण्यात आले आहेत. २० मार्च २०२५ या तारखेनं हे मुदतवाढीचं परिपत्रक राज्य शासनानं काढलं आहे.

# कलावंत सूक्ष्म निरीक्षण करणारा असला पाहिजे!

**शिल्पकार नंदकिशोर पाटील यांचे प्रतिपादन**

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चोपडा** प्रतिनिधी

भगिनी मंडळ, चोपडा संचलित, ललित कला केंद्र, चोपडा येथे नुकतेच चित्रगंध चित्रकला प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. याप्रसंगी सर्वप्रथम विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. नंतर कलाशिक्षक व शिल्पकार नंदकिशोर घनश्याम पाटील श्री. आ. गं. हायस्कूल सावदा यांच्या हस्ते चित्रकला प्रदर्शनाचे उद्घाटन व मान्यवरांच्या उपस्थित दीप प्रज्वलन करून स्वर्गीय डॉ. सुशिलाबेन शहा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. चित्र प्रदर्शनात डिझाईन, वस्तूचित्र, व्यक्तिचित्र, कागदकाम, मातीकाम



मोजायची चित्र, मंदिर, विवाह स्टेज व वाढदिवस स्टेज यांच्या प्रतिकृती करण्यात आल्या होत्या. प्रदर्शन एकूण २५० ते ३०० कलाकृतींनी नटलेले होते. वर्षभरातील सर्व विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कलाकृती मांडलेल्या होत्या.

याप्रसंगी आशिष गुजराथी यांनी नंदकिशोर पाटील यांना शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार केला तर सौ. पूनमबेन गुजराथी, अध्यक्षा, भगिनी मंडळ चोपडा यांचे स्वागत प्राचार्य सुनील बारी यांनी केले तर माननीय मान्यवर उपस्थितांमध्ये सन्माननीय छायाबेन अरविंद लाल गुजराथी व श्रीमती अश्विनीताई गुजराथी यांचे प्रा. विनोद पाटील व संजय नेवे यांनी स्वागत केले. यावेळी भगिनी मंडळ शैक्षणिक संकुलातील सर्व विभागातील मुख्याध्यापक व शहरातील शाळांचे कलाशिक्षक पंकज नागपुरे, अर्जुन कोळी, कमलेश गायकवाड, वसंत नागपुरे, शकील पिंजारी, प्रमोद हरी महाजन व संदीप विद्यापीठाचे मा. निलेश बनसोडे सर व सहकारी व विद्यार्थ्यांचे पालक आवर्जून उपस्थित होते.

**ग्रामपंचायत सामनेर ता.पाचोरा जि. जळगाव**
**ई – निविदा सुचना क्र. 06 सन 2024/2025 { प्रथम वेळ }**

सरपंच ग्रामपंचायत सामनेर ता.पाचोरा जि. जळगाव हे जळगाव जिल्हा परिषद कडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन Percentage rate tender दोन लिफाफा पध्दतीने १५ वा वित्त आयोग योजना अंतर्गत पुढील कामाची ई–निविदा मागवित आहे.

| अनु क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम रुपये | बयाना रक्कम रु. {परतावा} | टेंडर फी रक्कम रु. | आवश्यक ठेकेदार वर्ग | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | १५ वा वित्त आयोग अंतर्गत मौजे सामनेर ता.पाचोरा येथे भुमिगत आर.सी.सी.गटार बांधकाम करणे. | 499944/- | 00/- | 100/- | खुला | ६ महिने |

वरिल कामाची निविदा प्रपत्रे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. सदर निविदा प्रपत्रे, अटी, शर्ती, इ, सदर संकेतस्थळावर दिनांक 21/03/2025 रोजी 09.00 वाजेपासुन ते दिनांक 28/03/2025 रोजी 09.00 वाजेपर्यंत अधिग्रहीत [ Download ] करता येतील व इलेक्टॉनिक फारमॅटमध्ये ऑनलाईन पध्दतीने सादर करता येतील. ऑनलाईन सादर केलेल्या ई निविदा दिनांक 29/03/2025 रोजी 09.00 वा ग्रामपंचायत कार्यालयात उघडणेत येतील. सदर दिवशी ई निविदा उघडणे शक्य न झाल्यास कार्यालयाच्या वेळेच्या सोयीनुसार उघडणेत येतील.

ग्रा.पं.अ. सरपंच
ग्रामपंचायत सामनेर
ता.पाचोरा जि. जळगाव